**Blood Donation Camp 2018-2019**

दै. देशोन्नती दि. 12/12/2018

# लोकमान्य महाविद्यालय वरोरा येथे रक्तदान शिवीर



प्रतिनिधी / ११ डिसेंबर

**खांबाडा :** वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालय, वरोरा येथे राष्ट्रीय सेवा योजना, एच.डी. एफ. सी. बँक शाखा वरोरा व लाईफ लाईन ब्लड बँक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० डिसेंबर २०१८ रोज सोमवारला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराला सुरूवात करण्याआधी उदघाटन कार्यक्रम घेण्यात आला. या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जयश्री शास्त्री होत्या. तर उदघाटक म्हणून लाईफ लाईन ब्लड बँक, नागपूरचे अविनाश वाघरे हे होते. या कार्यक्रमाचे उदघाटक अविनाश वाघरे यांनी रक्तदान शिबिराच्या अयोजनामागची भूमिका मांडली तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्या जयश्री शास्त्री यांनी रक्तदानाचे महत्व या विषयी विचार मांडले. या उदघाटन कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी तानाजी माने यांनी केले तर आभार रासेयो सहकार्यक्रम अधिकारी दिपक लोणकर यांनी मानले.

या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग होता. या रक्तदान शिबिरात १४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

किसान विद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था, मर्या. माढेळी, र.नं. २१० तर्फे डोंगरगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार तथा जेष्ठ स्वातंत्र्य संग्राम सेनानी **स्व. नारायनराव हरबाजी माथनकर** यांना १०६ वी जयंती निमीत्य **विनम्र अभिवादन !**

**Tree Plantation Programme 2) 2018-19:-**

# लोकमान्य महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम



प्रतिनिधी / २ ऑगस्ट

**खांबाडा :** वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभगामार्फत "२०१७ ते २०१९ या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण ५० कोटी वृक्ष लागवड" या महाराष्ट्र शासनाच्या संकल्पानुसार महाविद्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे महत्व वैश्विक स्तरावर मान्य झाले आहे. सार्वजनिक समस्या हि वैयत्तिक समस्या समजून महाविद्यालय पातळीवर दरवर्षी वृक्ष लागवडीचे व संगोपनाचे कार्य चालतात. वृक्ष लागवड कार्यक्रमामध्ये एकूण ५० वृक्षांची महाविद्यालयाच्या परिसरात लागवड करण्यात आली आहे व संगोपन करण्यात येत आहे. या कार्यक्रमात लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील, प्राचार्य (प्रभारी) डॉ. जयश्री शास्त्री, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

**Swachhata Programme 2018-19:-**




स्वच्छता अभियानात सहभागी झालेले अहेतेश्याम अली व विद्यार्थी

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

◆ **वरोडा, १० ऑक्टोबर**

नगर परिषद व राष्ट्रीय सेवा योजना लोकमान्य महाविद्यालय वरोडा यांच्या संयुक्त वतीने स्वच्छता ही सेवा या मोहिमेंतर्गत महात्मा गांधी जयंतीनिमित्त शहीद डाहुले चौक ते एसटी स्टॅण्डपर्यंत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

अभियानाची सुरुवात नगर परिषदेपासून प्रभातफेरी काढून करण्यात आली. प्रभातफेरीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व नप कर्मचारी यांच्यासमवेत नगराध्यक्ष अहेतेश्याम अली, मुख्याधिकारी सुनील बल्लाळ, उपाध्यक्ष अनिल झोटिंग, ॲड. प्रदीप बुराण, डॉ. गुणानंद दुर्गे, अनिल साकरिया, डॉ. गायकवाड, छोटूभाई शेख, बाबा भागडे, ममता मरसकोल्हे, दिलीप घोरपडे आदी उपस्थित होते.

अहेतेश्याम अली व सुनील बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर नगर परिषदेचे कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानादरम्यान शहीद डाहुले चौक परिसराची स्वच्छता केली. त्यानंतर स्वच्छता अभियानाची सांगता नगर परिषद सभागृहात सर्व मान्यवर, नप कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासमक्ष कार्यालय अधीक्षक डॉ. प्रकाश कोटेचा यांनी स्वच्छतेची शपथ दिली. यशस्वितेसाठी स्वच्छता अभियंता आशिष गेडाम, स्वच्छता निरीक्षक भुषण सालवटकर, उमेश ब्राह्मणे, सर्व विभागप्रमुख, नप कर्मचारी यांनी सहकार्य केले. ◄*(तभा वृत्तसेवा)*

# न. प. तर्फे 'स्वच्छता अभियान संपन्न'

वरोरा (ता.प्र.)– नगरपरिषद वरोरा व राष्ट्रीय सेवा योजना लोकमान्य महाविद्यालय वरोरा यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छता हिच सेवा या मोहीमे अंतर्गत म. गांधी जयंती निमित्त शहीद डाहुले चौक ते एस. टी स्टॅण्ड रोड पावेतो स्वच्छता अभियान राबविन्यात आले. अभियानाची सुरूवात नगर परिषदेपासुन प्रभात फेरी काढुन करण्यात आली. प्रभातफेरीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व न. प. कर्मचारी यांचे समवेत अहेतेशाम अली अध्यक्ष सुनील बल्लाळ मुख्याधिकारी अनिल झोटींग उपाध्यंक्ष, ॲड प्रदिप बुराण, डॉ. गुणवंत दुर्गे, सदस्य अनिल साकरिया, डॉ. गायकवाड , छोटूभाई शेख, बाबा भागडे, ममता मरसकोल्हे, दिलीप घोरपडे, मनिषा मेश्राम,



सुनिता काकडे, अक्षय भिवदरे, रेखा समर्थ, मंगला पिंपळकर, दिपाली टिपले, सरला तेला, देऊळकर सर, माने सर व पेडगुलवार उपस्थित होते. अहेतशाम अली, व सुनिल बल्लाळ मुख्याधिकारी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले त्यांनंतर नगरपरिषदेचे कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानादरम्यान शहीद डाहुले चौक परिसराची स्वच्छता केली. त्यांनंतर स्वच्छता अभियानाची सांगता नगर परिषद सभागृहात सर्व मान्यवर, न. प. कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे समक्ष कार्यक्रम अधिक्षक डॉ. प्रकाश कोटेचा यांनी स्वच्छतेची शपथ वाचन करून सर्वांना स्वच्छतेची शपथ दिली. कार्यक्रम करीता स्वच्छता अभियंता आशिष गेडाम, भूषण सालवटकर, उमेश ब्राम्हणे, सर्व विभाग प्रमुख न. प. कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. (स)

**Programme of Lokshahi Pandharwada – 2019-2020**

# लोकशाही पखवाड़े पर निकाली जनजागृति रैली



वरोरा (सं). राज्य चुनाव आयोग और विभागीय आयुक्त कार्यालय नागपुर के निर्देशानुसार नगर परिषद व लोकमान्य महाविद्यालय वरोरा के संयुक्त तत्वावधान में लोकशाही पखवाड़ा आयोजित किया गया. कार्यक्रम में आयु के 18 वर्ष पूर्ण करने वाले युवक और युवती अपने मताधिकार का प्रयोग कर सकें इसलिए समय पर नाम पंजीयन कराने और शतप्रतिशत मतदान करने की अपील की गई. इसके लिए लोकमान्य महाविद्यालय से लोकशाही जनजागृति रैली निकाली. एसडीओ प्रमोद भुसारी ने हरी झंडी दिखाकर रैली को रवाना किया. इस अवसर पर निबंध, वक्तृत्व, विद्यार्थियों की स्थानीय स्वराज्य संस्था भेंट आदि उपक्रम लिए गए. मतदान के लिए एलईडी स्क्रीन से जनजागृति की गई. जनजागृति के लिए नगराध्यक्ष अहेतेशाम अली, मुख्याधिकारी सुनील बल्लाळ ने मार्गदर्शन किया.

## महिला बचत समूह का हुआ सम्मेलन

## व्यक्ति का शव मिला

वर्धा (का). स्थानीय रेलवे स्टेशन परिसर के पेट्रोल पम्प के पास पेड़ के नीचे व्यक्ति का शव पाया गया. जिससे परिसर में खलबली मच गई. मृतक की शिनाख्त हिंद नगर निवासी ओमकार ... (50) के रूप में की गई है. ... पुलिस ने आकस्मिक मृत्यु ...

# लोकशाही पंधरवड्यानिमित्त स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत मार्गदर्शन



वरोरा : स्थानिक लोकमान्य विद्यालय व नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर पंधरवडा २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत नगर परिषद क्षेत्रात साजरा करण्यात आला. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जैयश्री शास्त्री होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष अहेतेशाम अली, संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील, दिनकर घोरुडे, नायब तहसीलदार कोळ्पे, कार्यालय अधीक्षक डॉ. प्रकाश कोटेचा, वरिष्ठ लिपिक घनश्याम तिवारी उपस्थित होते. लोकशाही पंधरवडानिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष अहेतेशाम अली यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बळकटीकरणासाठी लोकांचा अधिकाधिक सहभाग व्हावा आणि नवमतदारांनी शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. श्रीकांत पाटील यांनी मतदारांनी जागरूकतेने मतदानाचा अधिकार बजावा, असे मत व्यक्त केले. तर नायब तहसीलदार कोळ्पे यांनी निवडणूक विभाग मतदानाची प्रक्रिया अधिकाधिक निर्भय करण्यासाठी कार्यरत असून, याबाबत मार्गदर्शन केले. तर डॉ. जयश्री शास्त्री यांनी कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य देऊळकर, प्रास्ताविक प्रा. माने यांनी केले. कार्यक्रमाला नगर परिषदेचे कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



चंद्रपूर महासागर दि. ३१/१/२०

## वरोरा नगर परिषद क्षेत्रात लोकशाही पंधरवाड्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

वरोरा दि. ३०(प्रतिनिधी): वरोरा नगर परिषद क्षेत्रात नगर परिषद वरोरा व लोकमान्य महाविद्यालय वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जानेवारी २०१९ ते दिनांक १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत लोकशाही पंधरवाडा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मतदानाकरीता पात्र ठरणाऱ्या नविन मतदारांना जागृत करणे आणि लोकशाही सदृढ करण्यासाठी राज्य शासनाकडुन लोकशाही पंधरवाडा साजरा केला जात आहे. या निमित्याने नगरपरिषद वरोरा तर्फे शहराच्या मुख्य ठिकाणी लोकशाही जन जागृती विषयक बॅनर लावण्यात आले आहे.

वरोरा नगर परिषदेमार्फतीने दिनांक २७ जानेवारी २०१९ ला प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर उपस्थित मान्यवर लोकशाही निवडणूक व सुशासन या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालयीन तरुणांमध्ये लोकशाहीचे मुल्य रुजविण्यासाठी लोकमान्य महाविद्यालयात दिनांक २८ जानेवारी २०१९ रोजी उपरोक्त कार्यक्रमांच्या अनुषंगाने वक्तृत्व स्पर्धा व दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजी निबंध स्पर्धा महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येणार आहे. तसेच वरोरा शहरातील नागरिकांमध्ये लोकशाही मुल्यप्रती जनजागृती करण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहेत. लोकशाही, विकेंद्रीकरणातील सर्वात महत्वाचा घटक म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्वाचे स्थान आहे म्हणून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजाची माहिती महाविद्यालयीन तरुणांना व्हावी यासाठी विद्यार्थ्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थेला भेटीचे देखील आयोजन करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना वरोरा नगर परिषदेचे व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडुन देखील मोलाचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रत्येक सर्व कार्यक्रम वरोरा शहराचे नगराध्यक्ष अहेतेशाम अली तसेच वरोरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुनील बल्लाळ तसेच लोकमान्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे प्रमुख उपस्थितीत पार पाडण्यात येणार आहेत.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

**Programme of Lokshahi Pandharwada – 2020-2021**

# लोकशाही पंधरवडा कार्यक्रमाची सांगता

**वरोरा** : राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत नगर परिषद व लोकमान्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. या पंधरवडाचा समारोप कार्यक्रम नुकताच पार पडला.

लोकशाही पंधरवड्यानिमित्त वरोरा शहरातील गांधी चौकात २६ जानेवारीला नगराध्यक्ष अहेतेशाम अली यांनी लोकशाही निवडणूक व सुशासन या विषयांवर मार्गदर्शन केले. या कालावधीत विविध कार्यक्रम मतदार जनजागृती रॅली, निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, चुनाव पाठशाला, चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांचा समारोप १० फेब्रुवारीला लोकमान्य महाविद्यालयात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग, उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष अहेतेशाम अली,




प्रमुख अतिथी म्हणून मुख्याधिकारी सुनील बल्लाळ, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रकाश कोटेचा उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. नानाजी माने यांनी केले. निबंध वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, रोख रक्कम व मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी न.प.चे मालमत्ता पर्यवेक्षक राजू खिरटकर व वरिष्ठ लिपिक घनश्याम तिवारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. देऊळकर यांनी केले. तर आभार प्रा. लोणकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**NSS Special Camp 2018-2019**

वासुदेव गडेगोने प्रकाश देवतळे, ...ने, विजय बावणे, वासुदेव ...राव पंडे, अनिल खनके, ...टे, जगन्नाथ चन्ने, गणपतराव ...मराव वैरागडे, भाऊराव ...पा हजारे, रावजी चवरे, ...जय मौगरे, शोभा पोटदुखे, ...देव वरभे, मधुकर राणीट, ...ते, एड. रविंद्र खनके, ...मोहनराव उमाटे, महेश ...के, प्रमोद बांगडे, विनोद ...चोपकर, बंडू गिरडकर, ...कर किरमे, शामराव ...रे, रमेश भुते, श्रावण ...वाढई, संध्या वाढई, ...हजारे, कैलास राहटे, ...नी नियुक्त बददल ...के यांचे अभिनंदन

# राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर



*प्रतिनिधी / १० जानेवारी*

**खांबाडा :** वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा पथकाचे सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन मौजा वनोजा येथे करण्यात आले. शिबिर 'ग्रामोन्नतीकरिता युवा शक्ती शिबिर' या संकल्पनेवर आधारित होते. या विशेष शिबिरात ग्रामोन्नतीकरिता व युवकांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सात दिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवकांचा सहभाग होता. या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे. पी.शास्त्री होत्या. तर उद्घाटक म्हणून श्रीकृष्णा घड्याळपाटील (कार्यवाह, लोक शिक्षण संस्था, वरोडा) व प्रा.श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोडा, ) सामाजिक कार्यक्रमाला सुवर्ण पाटील यांची उपस्थिती होती. तसेच या उद्घाटन कार्यक्रमाला वनोजाच्या सरपंच निर्मल गेघाटे, उपसरपंच कमलाकर मत्ते, ग्रामपंचायत सदस्य रोहन मोडक यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर या कार्यक्रमाला लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आणि वनोजा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बौद्धिक सत्रात अविनाश बन, सुवर्णरेखा पाटील , नानाजी नागरकर, अभ्यास संस्था, वरोरा , अरुण साळवे, व मारोती वरभे यांचे विविध विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जयश्री शास्त्री या होत्या. तर प्रमुख उपस्थिती म्हणून संजयबाबू देवतळे (माजी सांस्कृतिक व पर्यावरण मंत्री, म.रा.) प्रा. श्रीकांत पाटील, प्राचार्य अनिल डोंगरे (उपाध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोरा), निर्मला मेघाटे (सरपंच वनोजा) या विशेष शिबिराच्या समारोप कार्यक्रमास लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वृंद आणि वनोजा येथील गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# विदर्भ राज्य महानि...

*शहर प्रतिनिधी / १० जानेवारी*

**ब्रम्हपुरी :** विदर्भ राज्याच्या मागणी करिता केंद्र सरकार चे लक्ष वेधण्या करिता विदर्भ राज्य महानिर्माण यात्रा प्रत्येक शहरात जावुन विदर्भाची मागणी करत आहेत. आज ब्रम्हपुरी शहरात या विदर्भ राज्य महानिर्माण यात्रेचे आगमन सांयकाळी सात वाजता झाले. या स्वागता करिता ढोलताशे व फटाक्याच्या आतिशबाजी ने करण्यात आले. यात्रेचे प्रमुख मार्गदर्शक राम नेवले , डॉ. रमेशकुमार गजभिये माजी मंत्री, विजयां धोटे विदर्भवादी नेत्या,पोर्णिमा बिलुवे ,अँड. गोविंदराव भेडारकर, प्रा. देविदास जगनाडे ,हरीचद्र चोले, मान्यवर म्हनुन उपस्थित होते.डॉ.रमेश गजभीये माजी मंत्री यांनी बोलताना

**NSS Special Camp 2019-2020**

# लोकमान्य महाविद्यालय एकोणा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

वरोरा ● ता. प्रतिनिधी

येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन मौजा एकोणा येथे करण्यात आले. या विशेष शिबिराचा कालावधी ५ जानेवारी ते ११ जानेवारी २०२० हा होता.

या विशेष शिबिरात ग्रामनिर्मितीकरिता व युवकांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सात दिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवकांचा सहभाग होता. ४ जानेवारी २०२० रोजी पूर्वतयारी [illegible] शिबिराचे आयोजन [illegible] करण्यात आले. त्यात २५ हजार रु. ची औषधे गावकऱ्यांना वाटण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम ५ जानेवारी २०२० रोज रविवारला दुपारी २.३० वाजता घेण्यात आला.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डा.धानोरकर

या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधेधकुमार सिन्हा तर उद्घाटक म्हणून सुवर्णरेखा पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकांत पाटील, सुनंदा जीवतोडे, नितीन मत्ते, एकोणाच्या सरपंच रूपा पिंजदुरकर, उपसरपंच चंद्रशेखर पहापळे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

तसेच लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आणि एकोणा येथील ग्रामस्थ मोठ्य संख्येने उपस्थित होते. या सातदिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवक व गावकऱ्यांच्या सहभागातून गावातील मुख्य रस्त्यावरील सांडपाण्याची व्यवस्था लावण्यासाठी रस्त्याच्या बाजूला ७६८ मीटर लांबी व एक फूट रुंद नालीचे खोदकाम करण्यात आले. तसेच सातदिवसीय विशेष शिबिरात स्वयंसेवकाचा बौद्धिक, मानसिक विकास व्हावा या दृष्टीने रोज दुपारी २ ते ४ या वेळेत बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या बौद्धिक सत्रात सं... डाखरे, गजानन दुशेट्टीवा... मारोती वरभे, रमेशकुमार घार... रूपलालजी कावळे, गौत... पोडीले ,यशवंत साम्रे व भग... ढोल पथक यांच्या विवि... विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील व्यसनाधिनता, अधश्रद्धा, अनिष्ठ चालिरिती, रूढी, प्रथा व परंपरा याविषयी जनजागृती व्हावी या उद्देश... सातदिवसीय विशेष शिबिरात दैनंदिन सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले हो... या सांस्कृतिक कार्यक्रम लघुनाटिका, लोकगीते, एकांकीका सादर करण्य... आल्या.

त्यात 'मोबाईल दुष्परिणाम हागणदारी मुक्त शोषखड्डे अभियान' अ... लघुनाटिका सादर करण्य... आल्या.

**Blood Donation Camp 2020-2021**



चंद्रपूर Live देशोन्नती

रविवार, दि. १७ जानेवारी २०२१ https://www.deshon

## लोकमान्य महाविद्यालयात रक्तदान व अवयव संकल्पदान शिबिराचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...

खांबाडा ■ वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती निमित्त युवाशक्ती दिनाच्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन विस्तार व सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, रक्तदान व अवयव संकल्पदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. एस. के. सिंह होते.

यावेळी त्यांनी रक्तदानाचे महत्व सांगितले. लाइफ लाईन ब्लड बँकेचे डॉ. अविनाश बामळे यांनी रक्तपेढीची माहिती दिली. इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष, सीमा लाहोटी तसेच मोहन फाऊंडेशनच्या प्रार्थना द्विवेदी यांनी अवयव दानाची माहिती दिली. तर इनरव्हील क्लबच्या सचिव अपूर्वा बुजोणे यांनीही रक्तदानाची माहिती दिली. संचालन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. जयश्री शास्त्री यांनी, तर आभार सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी केले. एकुण २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर अवयव दान करण्याचा संकल्प १० जणांनी केला. (वार्ताहर)